Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – IX Issue – I January – February 2020

# माध्यमिक स्तरावर इतिहास अध्यापन

**डॉ. संजय पुरुषोत्तम शेडमाके**
*सहयोगी प्राध्यापक*
*पी.व्ही.डी.टी. कॉलेज ऑफ एज्यूकेशन फॉर वूमेन, चर्चगेट, मुंबई 20*

*सारांश –*

***21 व्या शतकातील आधुनिक काळातील शिक्षणात इतिहासाच्या शिक्षणाला अनन्यसाधारण महत्व प्राप्त झालेले आहे. माध्यमिक शिक्षणात इतिहासाचे महत्वाचे स्थान आहे. इतिहास म्हणजे मानवाच्या विकासाचा व ऱ्हासाचा वृत्तांत असल्यामुळे मानवाचा सांस्कृतिक वारसा जतन करणे, स्वातंत्र चळवळीचा इतिहास व राष्ट्राभिमान जागृत करणे, भूतकाळातील अनुभव, घटनांचा आधार घेवून वर्तमान काळातील विविध समस्या सोडविणे, आपले कर्तव्य व योगदान देवून राष्ट्राची उभारणी करणे, आंतरराष्ट्रीय सामंजस्य निर्माण करण्यासाठी सहिष्णुता वृत्तीची जोपासणा करणे असे अनेकविध हेतू आपणासमोर येतात.***

Golbal Oline Electronic International Reserch Journal's licensed Based on a work at http://www.goeiirj.com

**मुख्य संज्ञा –** माध्यमिक स्तर, इतिहास अध्यापन

**प्रस्तावना –**

माध्यमिक स्तरावर अध्यापन करतांना देशाभिमान जागृत करणे, नैतिक मुल्यांचे विकसन व राष्ट्राभिमानाचे संस्कार घडविणे हे लक्षात घेवून विद्यार्थ्यांची स्मरणशक्ती, कल्पणाशक्ती तर्कशक्ती विकसित करणे, योग्य सक्षम नागरिक घडविणे, मनोरंजनयुक्त ज्ञान देणे, ज्ञानासोबत चिकित्सक वृत्ती व संशोधनवृत्ती जोपासणे व वाढविणे इ. हेतू साध्य करण्यावर प्रमुखता भर दिला आहे.

**1. ज्ञान संपादन करणे :**

इतिहास अध्यापनाने विद्यार्थ्यांना इतिहासाचे योग्य ज्ञान संपादन करण्यास मदत मिळते. ज्ञान संपादन करतांना वेगवेगळया संकल्पना, ऐतिहासिक घटना, ऐतिहासिक घटना घडण्यामागचा हेतू, वेगवेगळे योध्ये व व्यक्तींचा परिचय व भौगोलिक स्थानांचा परिचय होतो.

**2. मर्मदृष्टी, तर्कनिष्ठता व चिकित्सक वृत्तीचा विकास करणे :**

ऐतिहासिक घटना, व्यक्ती इत्यादींचे फक्त आकलन होउन चालणार नाही तर एखादी ऐतिहासिक घटना का घडली याचा विचार करणे आवश्यक आहे. एखाद्या व्यक्तीने एखादा निर्णय घेतला तर तो का घेतला याचा विचार करण्याची क्षमता विद्यार्थ्यात निर्माण करण्यासाठी इतिहासाचे अध्यापन करावे लागते. उदा. प्लासीची 1757, बक्सारची 1764 ची लढाई किंवा 1857 चा इंग्रजांविरुध्दचा उठाव. 1857 चा उठाव का झाला ? तत्कालीन उठावात कोणत्या व्यक्ती सामिल झाल्या? उदा. मंगलपांडे, राणी लक्ष्मीबाई, तात्या

Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – IX Issue – I January – February 2020

टोपे हे या उठावात सहभागी झाले, त्यांचा हेतू काय होता याचा विचार करावा त्याची कारण मिमांसा करावी हा इतिहास अध्यापनाचा हेतू आहे.

**3. कृतित्मक कौशल्याचा विकास :**

इतिहासाचा अभ्यास करणे म्हणजे केवळ घटना, सनावळया, व्यक्ती यांचा अभ्यास करावयाचा इतपर्यंत मर्यादीत नाही तर काही कृतित्मक कौशल्याचा विकास करण्यास मदत करणे होय. उदा. नकाशा वाचन, नकाशाचे वाचन फक्त भूगोलातच शिकवायचे असले तरी त्याचे उपयोजन इतिहासात करावयाचे आहे. इंग्रजांनी त्यांच्या वसाहती कोठे स्थापन केल्या व त्या त्याच ठिकाणी का स्थापन केल्या हे नकाशा वाचन करण्याचे कौशल्य प्राप्त झाले तरच ते समजण्यासाठी सोपे जाते. म्हणजेच कौशल्य प्राप्त करण्यासाठी इतिहास मदत करते. रेखाटन करणे यासारखे कौशल्य इतिहास अध्यापनाच्या मदतीने विकसित करता येते. उदा. हरप्पा संस्कृती शिकवितांना घरांची रचना, रस्ते, गटार व्यवस्था यांचे रेखाटन करणे यातूनच हया कौशल्यांचा विकास होण्यास मदत होते. चित्र काढण्याचे कौशल्य इतिहासाच्या अध्यापनातून विकसित होते हे मान्य करावे लागेल. उदाहरण दयावयाचे झालेच तर वेगवेगळया व्यक्तींची व्यक्तीचित्र त्यामुळे अध्ययनसाहित्य म्हणून रेखाटन करावे लागते. या सगळया कृतीतून कृतित्मक कौशल्याचा विकास होतो.

**4. अभिवृत्ती व अभिरुचीचा विकास करणे :**

एखाद्या वस्तू किंवा वस्तूकडे पहाण्याचा दृष्टीकोण विकसित करुन अभिवृत्तीचा विकास इतिहास अध्यापनातून करता येण्यासारखा आहे. एखादी घटना का घडली असावी, त्यसमागील कारण काय असावे किंवा ऐतिहासिक वस्तू बघतांना ती का बांधली असावी? ती वस्तू तशीच का बांधली असावी उदा. ताजमहल हा सौंदर्यात्मक अनुभव प्राप्त करुन देतो. परंतू त्यामागचा हेतू हे जाणून घेण्याची इच्छा अभिवृत्ती व अभिरुची विकास साध्य होण्यास मदत होते.

**5. सामाजीक मूल्यांचा विकास करणे :**

इतिहास अध्यापनाचा हेतू सामाजिक मूल्यांचा विकास करणे हा आहे. इतिहास विषय अध्ययन अध्यापनातून मानवी संबंधंचा विकास कसा झाला हे कळावयास मदत होते. मानवाचे हित कशामध्ये आहे हे समजण्यास मदत होते. माणव समाजातिल प्रेम, लोकशाही वृत्तीची जोपासणा, समाजवाद, धर्मनिरपेक्षता, बंधुता, समानता, विविध जातितील एकोपा, सहिष्णवृत्ती, राष्ट्राभिमान, राष्ट्रभक्ती, आंतरराष्ट्रीयत्वाची जाणिव, शूरता, त्याग, विचार स्वातंञ्य इत्यादी सामाजिक मूल्यांचा विकास इतिहास विषयाच्या अध्यापनातून होण्यास मदत होते.

**6. सौंदर्यात्मक दृष्टीकोन विकसित करणे :**

ऐतिहासिक वास्तूंच्या अभ्यासाणे त्या वस्तूबाबत ज्ञान प्राप्त होते परंतू त्या वास्तूची ऐतिहासिक पार्श्वभूमी समजल्यामुळे माहितीसोबत त्याच्या कलात्मकतेचा आस्वाद घेता येतो. वास्तूचे संवर्धन करण्याची वृत्ती विकसित होते. त्यापासून आनंद प्राप्त होतो. अध्ययनकर्त्यामध्ये सोदर्यात्मक दृष्टीकोण निर्माण

करण्याचे कार्य इतिहास अध्यापनातून होते.

**7. नेतृत्वाचा विकास करणे :**

इतिहासाच्या अध्यापनाचा हेतू विद्यार्थ्यामध्ये अध्यापकाने नेतृत्वगुणाचा विकास करणे हा आहे. सामाजिक अन्यायांचा इतिहास जाणण्याचा सर्वात योग्य मार्ग म्हणजे इतिहासाचे अध्यापन होय. इतिहासातून वेगवेगळया नेतृत्वगुणाचा अभ्यास करावयास मिळतो. उदा. 1857 मध्ये मंगल पांडे, तात्याटोपेचे नेतृत्व, राणी लक्ष्मीबाईचे नेतृत्व, गांधीजींनी केलेले नेतृत्व, बाबासाहेब आंबेडकरांनी मागासवर्गीय विकासासाठी केलेले नेतृत्व हे अध्ययनकर्त्याचा नेतृत्व विकास करण्यास पुरक ठरते हयातूनच इतिहास अध्यापनाचा नेतृत्वविकास हा हेतू साध्य होतो.

**8. नैतिक मूल्यांचा विकास :**

नैतिक विकास अध्ययन कर्त्याचा व्हावा हा कुठल्याही विषय अध्यापनाचा हेतू असतोच परंतू इतिहास अध्यापन अध्यायनातून अध्ययन कर्त्याचे नैतिकविकास साधला जातो. नैतिक मूल्यातून अध्ययन कर्त्यामध्ये सत्याबाबत प्रेम, चारित्रसंवर्धन, मानवता, बंधुत्व इत्यादी गुणाचा विकास इतिहास अध्यापनातून होण्यास मदत होते. ऐतिहासिक घडामोडीतून इतरांबददल प्रेम, आदर, बंधुत्वाची भावना, मानवतावादी दृष्टीकोन निर्माण होण्यास मदत होते.

**9. संशोधन वृत्ती विकसित करणे :**

इतिहासाचे अध्ययन अध्यापन संशोधन वृत्ती विकसित करण्यास पुरक ठरते. उदा. हरप्पा संस्कृतीचा उदय उत्खननामधून एका वेगळया संस्कृतीचा शोध हे संशोधनाचे उदाहरण आहे. किंवा कोणत्याही घटनेकडे बघतांना जर संशोधक वृत्तीने बघीतले तर वेगळी तथ्ये अध्ययन कर्त्याला मिळतील त्यामुळे कोणत्याही घटनेकडे बघतांना संशोधन वृत्तीने बघणे संशोधन वृत्ती विकसित करण्यास मदत करते.

**10. फुरसदीच्या वेळेचा सदुपयोग :**

कोणत्याही देशाचा विकास तेथील लोक आपल्या फुरसदीच्या वेळेचा सदुपयोग कसा करतात यावर अवलंबून असतो. इतिहास असा विषय आहे की या अध्ययनाने वर्तमान विकास घडून येतो व भविष्य ठरविता येते. ऐतिहासिक घटना जरी फुरसदीच्या काळात वाचल्या तरी भविष्यकाळाचा कसा विचार करावा याची चाहूल लागते. त्यामूळे फुरसदीच्या वेळेचा सदुपयोग कसा करावा हे इतिहास अध्ययनातून साध्य होते.

**11. वस्तुनिष्ठ दृष्टीकोण निर्माण करणे :**

इतिहासाचे अध्ययन अध्यापन करणे म्हणजे वस्तुनिष्ठ ज्ञानामध्ये भर पाडणे होय. काही गोष्टी ऐकीव असतात त्यामूळे अध्ययन कर्त्याच्या ज्ञानाला मर्यादा पडतात. उदा .इंग्रजांबाबत झालेल्या धारण इंग्रजांनी केवळ गुलामगीरीत ठेवले परंतु सतीप्रथासारख्या कुप्रथातून बाहेर काढले. हयाचे ज्ञान इतिहासाच्या अध्ययनातूनच प्राप्त होते. रेल्वे, टपाल, रस्ते यांचा विकास इंग्रजांनी चांगला घडवून आणला

याचे ज्ञान इतिहासातून होते. भारतिय समाजाला कर्मकांडातून सोडविण्यासाठी इंग्रजांनी पुढाकार घेतला याचे ज्ञान अध्ययन कर्त्याला झाल्याशिवाय राहत नाही. म्हणजेच इतिहास अध्ययन अध्यापनाने वस्तुनीष्ठ दृष्टीकोण निर्माण होतो असे म्हणावयास हरकत नाही.

**संदर्भग्रंथ –**

1. बापट, भा. गो. (1995), शैक्षणिक संशोधन. पुणे : नूतन प्रकाशन.
2. बरकले, आर. व सूर्यवंशी, व्ही. (2008), इतिहास शिक्षण. नाशिक : इनसाईट पब्लिकेशन.
3. चितळे, शं. दा. (1971), इतिहास कसा शिकवावा. पुणे : विद्यार्थी गृह प्रकाशन.